महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४
webside www.sscboardkolhapur.in Chairman 2690829 , Secretary 2691405
(O) PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@ gmail.co

क्र.कोविमं/उ.मा.परीक्षा/ 2890
दिनांक :२३.०१.२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :** राष्ट्रीय व राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थितीमध्ये सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :** १. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र. १८५/एसडी-२ दि.१६/११/२०१६
२. क्र.रा.मं./परीक्षा-७/३२१ पुणे दि. १८/०१/२०१९ चे पत्र

उपरोक्त विषयी संदर्भिय परिपत्रक पहावे. राष्ट्रीय व राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्या-या इ ९ वी ते १२ वी मधील खेळाडू विद्यार्थ्यांना संबंधित शैक्षणिक वर्षातील त्यांच्या शाळेतील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पर्यत असल्यास ती ग्राहय धरणात यावी. अपवादात्मक परिस्थितीत संबंधित खेळाडू विद्यार्थ्याची शाळेतील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पेक्षा कमी असल्यास त्यास संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या पूर्व परवानगीने वार्षीक परीक्षेस बसण्याची अनुमती द्यावी. सदर पूर्व परवानगी घेण्याची जबाबदारी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांची राहील. तसेच अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचा पाल्य कोणत्या राष्ट्रीय/राज्य क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होणार आहे/झाला आहे. याबाबत आवश्यक तपशील शाळेतील मुख्याध्यापकांकडे देणे अनिवार्य राहील. असे नमुद केले आहे.

तथापी या संदर्भात कळविण्यात येते की, इयत्ता १० वी व १२ वी साठी अपवादात्मक परिस्थितीत संबंधित खेळाडू विद्यार्थ्याची शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पेक्षा कमी असल्यास त्यास संबंधित विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या पूर्व परवानगीने मंडळाच्या इ. १० वी व १२ वी परिक्षेस बसण्याची मान्यता घ्यावी. सदर पूर्व परवानगी घेण्याची जबाबदारी संबंधीत शाळेच्या/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांची/ प्रचार्यांची राहील. याप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे.

शासनादेश प्रतिक्षित आहेत. तरी सदर प्रकरणी फेब्रुवारी-मार्च २०१९ च्या परीक्षेकरिता इ.१० वी व १२ वी साठी अपवादात्मक परिस्थितीत संबंधित खेळाडू विद्यार्थ्यांची शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पेक्षा कमी असल्यास संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या पूर्व परवानगीने मंडळाच्या ता इ.१० वी व १२ वी परीक्षेस बसण्याची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी -
मा.सचिव,राज्य मंडळ पुणे-०४.

Rao general